चाणक्य मंडल परिवार

प्रश्नपुस्तिका

# अर्थशास्त्र

## National Income

वेळ : एक तास

एकूण प्रश्न : 50

एकूण गुण : 100

### सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **50** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनात बॉलपेनने लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

(3) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे.

(4) **ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेतदेखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(6) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक तृतीयांश गुण वजा करण्यात येतील".**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे.

*****

चाणक्य मंडल परिवार

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

1. खालील विधानांचा विचार करा.

(अ) ज्या देशांमध्ये परकीय गुंतवणूक मोठ्या प्रमाणात होते त्या देशांची स्थूल देशांतर्गत उत्पाद ही स्थूल राष्ट्रीय उत्पादापेक्षा कमी असते.

(ब) भारताचे स्थूल देशांतर्गत उत्पाद जे स्थूल राष्ट्रीय उत्पाद पेक्षा थोडी जास्त आहे.

योग्य विधाने ओळखा.

पर्यायी उत्तरे :

(1) अ फक्त (2) ब फक्त

(3) अ आणि ब (4) अ व ब दोन्ही नाही

Consider the following statement.

(a) Countries with the highest level of foreign direct investment have a gross domestic product less than the gross national product.

(b) India's gross domestic product is slightly higher than gross national product.

Identity correct statements.

Answer options

(1) a only (2) b only

(3) a and b (4) None of the above

---

2. उत्पादनाचे खालीलपैकी कोणते घटक नाहीत?

(अ) भांडवल (ब) श्रम

(क) जमीन (ड) नफा

पर्यायी उत्तरे :

(1) अ फक्त (2) अ आणि ब

(3) वरीलपैकी सर्व (4) वरीलपैकी एकही नाही

Which of following are not the factors of production?

(a) Capital (b) Labour

(c) Land (d) Profit

Answer options :

(1) a only (2) a and b

(3) All of the above (4) None of the above



चाणक्य मंडल परिवार

3. बाजार किंमत म्हणजे

(1) घटक किंमत - अप्रत्यक्ष कर - अनुदाने
(2) घटक किंमत + अप्रत्यक्ष कर + अनुदाने
(3) घटक किंमत - अनुदाने + अप्रत्यक्ष कर
(4) घटक किंमत + अनुदाने - अप्रत्यक्ष कर

Market Price is,

(1) Factor cost - Indirect taxes - subsidies
(2) Factor cost + Indirect taxes + Subsidies
(3) Factor cost - Subsidies + Indirect taxes
(4) Factor cost + Subsidies - Indirect Taxes.

---

4. खालील विधानांचा विचार करा.

(अ) देशांतर्गत उत्पन्नात व्यक्ती किंवा संस्थांचे राष्ट्रीयत्व विचारात घेतले जाते.
(ब) राष्ट्रीय उत्पन्नात व्यक्ती किंवा संस्थांचे राष्ट्रीयत्व विचारात घेतले जात नाही.

योग्य विधाने ओळखा.

(1) अ फक्त
(2) ब फक्त
(3) अ व ब दोन्ही
(4) अ व ब दोन्ही नाही

Consider the following statement.

(a) Nationality of individuals or organizations is taken into account in domestic income.
(b) National income does not take into account the nationality of individuals or organisations.

Identify the correct statements.

(1) a only
(2) b only
(3) a and b both
(4) a and b none of them

---

5. राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याच्या किती पद्धती आहेत?

(1) 1
(2) 3
(3) 2
(4) 4

How many methods to measure National income?

(1) 1
(2) 3
(3) 2
(4) 4



चाणक्य मंडल परिवार

6. भारतीय GDP चा विचार करता अयोग्य विधान कोणते?

(अ) प्राथमिक क्षेत्राचा हिस्सा सर्वाधिक राहिला आहे.

(ब) सेवा क्षेत्राचा हिस्सा 2009-10 ते 2019-20 या काळात वाढता राहिला आहे.

पर्यायी उत्तरे

(1) अ योग्य (2) ब योग्य

(3) अ अयोग्य (4) दोन्ही योग्य

Considering India's GDP which statement/s is/are incorrect.

(a) Primary sector has the highest share in India's GDP.

(b) Service sector's share has continued to grow form 2009-10 to 2019-20..

Answer options

(1) a correct (2) b correct

(3) a incorrect (4) Both incorrect

---

7. 2015 पासून केंद्रीय सांख्यिकी संस्था (CSO) स्थूल मूल्यवर्धित (GVA) मोजण्याकरता कोणती संकल्पना वापरते?

(1) GVA Factor cost (2) GVA Basic price

(3) GVA Market price (4) वरीलपैकी एकही नाही

From 2015 central statistics office uses which concept to measure Gross value added?

(1) GVA Factor cost (2) GVA Basic price

(3) GVA Market price (4) None of the above

---

8. खालील विधानांचा विचार करा.

(अ) उत्पादन पद्धती वस्तू व सेवांचे निव्वळ मूल्य वृद्धी दर्शविते.

(ब) उत्पन्न पद्धती वस्तू व सेवांचे स्थूल देशांतर्गत उत्पन्न दर्शविते.

योग्य विधान कोणते?

पर्यायी उत्तरे:

(1) अ फक्त (2) ब फक्त

(3) अ व ब दोन्ही (4) अ नाही ब नाही

Consider the following statements.

(a) Production method shows net value increase of goods and services.

(b) The income method shows the basic domestic income of goods and services

Identify the correct

Answer Options:

(1) Only a (2) Only b

(3) Both correct (4) Both incorrect



चाणक्य मंडल परिवार

9. समजा 2012 मध्ये उपभोग खर्च 24 कोटी, गुंतवणूक खर्च 16 कोटी, शासनाच्या प्रकल्पांवर 20 कोटी खर्च तसेच निर्यात 10 कोटी आणि आयात 12 कोटींची होती तर स्थूल देशांतर्गत उत्पादन किती असेल?

(1) 62
(2) 53
(3) 58
(4) 50

Suppose in 2012 consumption expenditure was 24 Cr. investment expenditure was 16 cr, expenditure on government projects was 20 cr and export was of 10 cr and imports were 12 cr then what is the gross domestic product?

(1) 62
(2) 53
(3) 58
(4) 50

---

10. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या खालीलपैकी कोणत्या परिमाणात देशाच्या नागरीकांनी विदेशातून कमावलेली प्राप्ती समाविष्ट केली जाते?

(1) एकूण देशांतर्गत उत्पादन
(2) एकूण राष्ट्रीय उत्पादन
(3) निव्वळ देशांतर्गत उत्पादन
(4) स्थिर किमतीतील निव्वळ देशांतर्गत उत्पादन

Which of the following measures of the national income of a country includes the income earned by citizens of a country from abroad?

(1) Gross Domestic Product
(2) Gross National Product
(3) Net Domestic Product
(4) Net Domestic Product at Constant Price

---

11. (अ) ज्या क्षेत्राचा पैसे किंवा चलनामध्ये रुपांतर करता येत नाही अशा क्षेत्रांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्न मोजताना केला जात नाही.

(ब) घरगुती वापरासाठी वापरले जात असलेल्या अन्नाचा आर्थिकदृष्ट्या विचार केला जात नाही.

पर्यायी उत्तरे

(1) अ बरोबर ब चूक
(2) अ व ब दोन्ही बरोबर असून ब या विधानाचे अ कारण आहे
(3) अ चूक ब बरोबर
(4) दोन्ही चूक

(a) Sectors which cannot be converted into money or currency are not included in the calculation of national income.

(b) Foods/grains used for domestic consumption is not considered economically.

Answer option

(1) a correct, b incorrect
(2) a and b both correct, a is the reason of statement b.
(3) a incorrect, b correct
(4) Both incorrect



चाणक्य मंडल परिवार

12. खालीलपैकी कोणत्या देशाने स्थूल राष्ट्रीय आनंद निर्देशांक त्यांच्या संविधानात समाविष्ट केला आहे?

(1) भारत (2) चीन

(3) नेपाळ (4) भूतान

Which of the following country included gross national happiness in their constitution?

(1) India (2) China

(3) Nepal (4) Bhutan

---

13. राष्ट्रीय सांख्यिकी आयोगाची स्थापना कधी झाली?

(1) जून 2005 (2) जून 2007

(3) मे 1951 (4) ऑगस्ट 1949

National statistical commission was formed on?

(1) June 2005 (2) June 2007

(3) May 1951 (4) August 1949

---

14. उत्पन्नाचे मूलभूत प्रकार कोणते?

(अ) घटक उत्पन्न

(ब) गैर घटक उत्पन्न

पर्यायी उत्तरे

(1) अ फक्त (2) ब फक्त

(3) अ व ब दोन्ही (4) अ व ब दोन्ही नाही

What are the basic types of income?

(a) Factor income

(b) Non-factor income

Answer options

(1) a only (2) b only

(3) a and b both (4) a and both not

चाणक्य मंडल परिवार

15. खालील विधानांचा विचार करा.
(अ) देशातंर्गत उत्पन्न म्हणजे फक्त निवासींना प्राप्त होणारे घटक उत्पन्न.
(ब) राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे निवासी तसेच गैरनिवासींना प्राप्त होणारे घटक उत्पन्न.
योग्य विधान/ने कोणती
(1) अ फक्त (2) ब फक्त
(3) अ व ब दोन्ही नाही (4) अ व ब दोन्ही
Consider the following statements.
(a) Domestic income means the factor income received by residents only.
(b) National income means the factor income received both by residents and non residents.
Identify the correct statements.
(1) a only (2) b only
(3) Both are incorrect (4) Both correct

---

16. खालील विधानांचा विचार करा.
(अ) चीनने 2006 साली 2005 सालचे हरीत GDP मोजला.
(ब) भारतात हरित GDP साठी सर पार्थ दासगुप्ता ही समिती स्थापन करण्यात आली.
योग्य विधान ओळखा.
पर्यायी उत्तरे
(1) अ फक्त (2) ब फक्त
(3) अ व ब दोन्ही (4) अ व ब दोन्ही नाही
Consider the following statements.
(a) China calculated green GDP for year 2005 in 2006.
(b) Sir Parth Dasgupta committee was formed to calculate Green GDP in India.
Identify the correct statements.
Answer option
(1) a only (2) b only
(3) a and b both (4) None of the above

---

17. नैसर्गिक स्त्रोतांची आकडेवारी मोजण्याचा प्रयोग प्रथम कोणत्या राज्याने केला?
(1) महाराष्ट्र (2) हिमाचल प्रदेश
(3) सिक्कीम (4) गोवा
Which state first experimented with statistics of natural resources?
(1) Maharashtra (2) Himachal Pradesh
(3) Sikkim (4) Goa

चाणक्य मंडल परिवार

18. खालीलपैकी कोणत्या पद्धतीने मोजलेले उत्पन्न हे तुलनेने त्रुटीरहित असते?

(1) उत्पन्न पद्धत
(2) उत्पादन पद्धत
(3) मूल्यवर्धित पद्धत
(4) खर्च पद्धत

Income calculated by following method is relatively error free?

(1) Income method
(2) Production method
(3) Value added method
(4) Expenditure method

---

19. खालीलपैकी कोणत्या पद्धतीत अर्थव्यवस्थेतील क्षेत्रांचे तुलनात्मक महत्त्व प्रकट करते?

(अ) उत्पादन पद्धत
(ब) खर्च पद्धत
(क) उत्पन्न पद्धत
(ड) मूल्यवर्धित पद्धत

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त ब
(2) फक्त ब आणि क
(3) अ आणि ड
(4) अ व ब

Which of the following method reveals the comparative importance of sectors in the economy?

(a) Production method
(b) Expenditure method
(c) Income method
(d) Value added method

Answer option

(1) Only b
(2) Only b and c
(3) a and d
(4) a and b

चाणक्य मंडल परिवार

20. योग्य जोड्या जुळवा.

| उत्पन्न मोजण्याची पद्धत | क्षेत्र |
|---|---|
| (अ) उत्पादन पद्धत | (i) शहरी बांधकामासाठी |
| (ब) खर्च पद्धत | (ii) ग्रामीण बांधकामासाठी |
| (क) उत्पन्न पद्धत | (iii) सेवा क्षेत्रासाठी |
| (ड) वस्तू प्रवाह पद्धत | (iv) कृषी व उद्योग क्षेत्रासाठी |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | ii | iii | i |
| (2) | iii | iv | ii | i |
| (3) | iv | i | iii | ii |
| (4) | ii | iii | iv | i |

Match the following pairs.

| Methods (Income Measure) | Sectors |
|---|---|
| (a) Production method | (i) For Urban construction |
| (b) Expenditure method | (ii) For Rural construction |
| (c) Income method | (iii) For Service sector |
| (d) Object flow method | (iv) For agriculture and manufacturing sector |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | ii | iii | i |
| (2) | iii | iv | ii | i |
| (3) | iv | i | iii | ii |
| (4) | ii | iii | iv | i |

21. खालीलपैकी योग्य विधान ओळखा.

(अ) राष्ट्रीय उत्पाद बाजारभावाला मोजतात.

(ब) राष्ट्रीय उत्पन्न घटक किंमतीला मोजतात.

पर्यायी उत्तरे

(1) अ फक्त
(2) ब फक्त
(3) अ आणि ब
(4) अ व ब दोन्ही नाही

Which of the following statements are correct?

(a) National product measures at market price.

(b) National income measures at factor price.

Answer option

(1) a only
(2) b only
(3) a and b
(4) None of a and b

22. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) 2004-05 हे आधारभूत वर्ष के. सुंदरम समितीच्या शिफारसीवरून स्वीकारले गेले.

(ब) 2011-12 हे आधारभूत वर्ष अभिजित सेनगुप्ता समितीच्या शिफारसीवरून स्वीकारले गेले.

योग्य विधाने ओळखा.

पर्यायी उत्तरे:

(1) अ व ब दोन्ही अयोग्य
(2) अ योग्य
(3) ब योग्य
(4) अ व ब दोन्ही योग्य

Consider the following statements.

(a) 2004-05 is the base year, accepted on the recommendation of the K. Sundaram committee.

(b) 2011-12 is the base year, accepted on the recommendation of the Abhijit Sengupta committee.

Identify correct statements.

(1) Both incorrect
(2) a correct
(3) B correct
(4) Both correct

---

23. लॉरेंझ वक्र खालीलपैकी कशाचे विश्लेषण करतो?

(1) भाववाढ व बेरोजगारीचे
(2) आर्थिक वृद्धीचे
(3) उत्पन्नाच्या असमानतेचे
(4) यापैकी नाही

Which of the following is explained by Lorentz curve?

(1) Inflation and unemployment
(2) Economic growth
(3) Income inequality
(4) None of the above

---

24. प्रणव वर्धन यांनी खालीलपैकी कोणती संज्ञा मांडली?

(1) हरित राष्ट्रीय उत्पन्न
(2) सार्वभौमिक मूलभूत उत्पन्न
(3) राष्ट्रीय उत्पन्न
(4) एकूण देशांतर्गत उत्पन्न

Which concept was proposed by Pranav Vardhan from following?

(1) Green National income
(2) Universal Basic income
(3) National income
(4) Total Domestic income



चाणक्य मंडल परिवार

25. भारताचे स्थूल राष्ट्रीय उत्पाद कोणत्या परिमाणात मोजतात?
(अ) भौतिक परिमाण
(ब) टक्केवारीत
(क) आर्थिक परिमाणात
पर्यायी उत्तरे
(1) अ व ब
(2) ब फक्त
(3) क फक्त
(4) वरीलपैकी सर्व

India's gross national product is measured in which dimensions?
(a) Physical dimensions
(b) In percentage
(c) Economic dimensions
Answer options
(1) a and b
(2) b only
(3) c only
(4) All of the above

---

26. योग्य जोड्या जुळवा.

| व्यक्ती | राष्ट्रीय उत्पन्न |
|---|---|
| (अ) दादाभाई नौरोजी | (i) 1942 कोटी |
| (ब) विलीयम डिग्बी | (ii) 1067 कोटी |
| (क) फिंडले शिरस | (iii) 390 कोटी |
| (ड) वाडिया व जोशी | (iv) 340 कोटी |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | iii | i | iii |
| (2) | iv | iii | ii | i |
| (3) | ii | iv | iii | i |
| (4) | i | ii | iii | iv |

Match the pairs.

| Person | National Income |
|---|---|
| (a) Dadabhai Naoroji | (i) 1942 crore |
| (b) William Digbi | (ii) 1067 crore |
| (c) Findlay Shirras | (iii) 390 crore |
| (d) Wadia and Joshi | (iv) 340 crore |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | iii | i | iii |
| (2) | iv | iii | ii | i |
| (3) | ii | iv | iii | i |
| (4) | i | ii | iii | iv |



चाणक्य मंडल परिवार

27. खालीलपैकी कोणत्या संकल्पना "राष्ट्रीय उत्पन्न" या संकल्पनेशी संबंधीत आहेत?

(अ) साठा

(ब) अंशलक्षी

(क) प्रवाही

पर्यायी उत्तरे

(1) अ आणि क
(2) क फक्त
(3) अ फक्त
(4) वरीलपैकी सर्व

Which of the following concepts are related to the National income?

(a) Stock

(b) Partial

(c) Flow

Answer option

(1) a and b
(2) c only
(3) a only
(4) All of the above

---

28. राष्ट्रीय उत्पन्न मोजताना खालीलपैकी कोणत्या अडचणी नाहीत?

(1) संकल्पनात्मक अडचणी
(2) सांख्यिकीय अडचणी
(3) अ व ब दोन्ही
(4) अ व ब दोन्ही नाहीत

Which of the following is/are not a problem while calculating national income?

(1) Conceptual difficulties
(2) Statistical difficulties
(3) Both a and b
(4) Both a and b are not

चाणक्य मंडल परिवार

29. योग्य जोड्या जुळवा.

| पुस्तक | लेखक |
|---|---|
| (अ) जनरल थेअरी ऑफ एम्प्लॉयमेंट इंटरेस्ट ॲण्ड मनी | (i) रोस्टो |
| (ब) कॅपिटल | (ii) दादाभाई नौरोजी |
| (क) स्टेजेस ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ | (iii) केन्स |
| (ड) पॉव्हर्टी ॲण्ड अनब्रिटिश रूल इन इंडिया | (iv) थॉमस पिकेटी |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | iii | i | ii |
| (2) | iii | iv | i | ii |
| (3) | i | iv | iii | ii |
| (4) | ii | iii | i | iv |

Match the pairs.

| Books | Writer |
|---|---|
| (a) General theory of employment interest and money | (i) Rosto |
| (b) Capital | (ii) Dadabai Naoroji |
| (c) Stages of economic Growth | (iii) Keynes |
| (d) Poverty and unbritish rule in India | (iv) Thomas Piketty |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | iii | i | ii |
| (2) | iii | iv | i | ii |
| (3) | i | iv | iii | ii |
| (4) | ii | iii | i | iv |

---

30. प्रगत औद्योगिक समाजातील ठळक वैशिष्ट्ये कोणते नाही?

(अ) पुरेशी सामाजिक सुरक्षितता
(ब) मोफत शिक्षण
(क) मोफत अन्नधान्य

पर्यायी उत्तरे :

(1) वरीलपैकी सर्व (2) अ, ब
(3) ब, क (4) फक्त अ

Which of the following is not a salient feature of an advanced industrial society?

(a) Adequate social security (b) Free education
(c) Free food

Answer option

(1) All of the above (2) a and b
(3) b and c (4) Only a

चाणक्य मंडल परिवार

31. खालीलपैकी कोणते/ती विधाने योग्य आहेत?

(1) वैयक्तिक उत्पन्न एखाद्या देशाच्या व्यक्तीच्या उत्पन्नाचा संदर्भ देते.

(2) प्रत्यक्ष कर भरल्यानंतर मिळणाऱ्या उत्पन्नाला व्ययक्षम उत्पन्न म्हणतात.

(3) दोन्ही अ आणि ब योग्य

(4) वरीलपैकी एकही योग्य नाही

Which of the following statement is/are true?

(1) Personal income prefers to the income of individuals of a country.

(2) The income at their disposal after paying direct taxes is called disposable income.

(3) Both a and b

(4) None of the above

---

32. खालीलपैकी योग्य विधान ओळखा.

(अ) कृषी व खाणकाम उद्योग प्राथमिक क्षेत्रात मोडतात.

(ब) उत्पादन बांधकाम वीज पाणीपुरवठा द्वितीयक क्षेत्रात मोडतात.

(क) बौद्धिक संपदा आधारीत सेवा चतुर्थ क्षेत्रात मोडतात.

(ड) व्यापार, हॉटेल वाहतूक दळणवळण, व्यावसायिक सेवा या तृतीयक क्षेत्रात मोडतात.

पर्यायी उत्तरे:

(1) अ, क (2) ब, ड

(3) क, ड (4) अ, ब, ड

Identify the correct statements from following.

(a) Agriculture and mining industries falls into primary sector..

(b) Manufacturing, construction, electricity, water supply falls under secondary sector.

(c) Services based on intellectual property falls under quaternary sector.

(d) Trade, hotel, transport, communication, business services falls under tertiary sector.

Answer Options:

(1) a and c (2) b and d

(3) c and d (4) a, b, d



चाणक्य मंडल परिवार

33. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) क्षेत्रीय GDP विचारात घेताना स्थिर घटक मूल्य किंमतीला मोजलेला GVA विचारात घेतला जातो.

(ब) या आधी क्षेत्रीय GDP साठी स्थिर मूळ किंमतीला मोजलेला GVA विचारात घेतला जायचा.

योग्य विधाने कोणती?

(1) अ व ब दोन्ही (2) अ व ब दोन्ही नाही

(3) अ फक्त (4) ब फक्त

Consider the following statements.

(a) GVA measured at constant factor price is taken into account while considering sectoral GDP.

(b) Earlier, for sectoral GDP, GVA calculated at fixed base price was considered.

Identify the correct statements.

(1) a and b both (2) None of a and b

(3) a only (4) b only

---

34. खालीलपैकी योग्य विधाने ओळखा.

(अ) दरडोई उत्पन्न मोजण्यासाठी वाडिया व जोशी यांनी सर्वप्रथम शास्त्रीय पद्धतीचा वापर केला.

(ब) डॉ. व्ही. के. राव यांनी उत्पादनाची गणना व उत्पन्नाची गणना या दोन्ही पद्धतीचा वापर केला.

(क) राव यांच्या पाहणीनुसार भारताचे दरडोई उत्पन्न 1925 ते 1929 या काळात 62 रु. भरले.

(ड) राव यांच्या पाहणीनुसार भारताचे दरडोई उत्पन्न 1931-32 साठी 62 रु. भरले.

पर्यायी उत्तरे

(1) अ, ब, क (2) अ, ब, ड

(3) फक्त ब (4) ब आणि ड

Identify the correct statements from following.

(a) To calculate the per capita income, Wadia and Joshi were the first to use the classical method.

(b) Dr. V. K. Rao used both the method of calculation of production and calculation of income.

(c) According to Rao's survey India's per capita income from 1925 to 1929 was Rs. 62.

(d) According to Rao's survey, India's per capita income for year 1931-32 was Rs. 62

Answer option

(1) a, b, c (2) a, b, d

(3) Only b (4) b and d

चाणक्य मंडल परिवार

35. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याच्या प्रयत्नाविषयी खालील विधाने लक्षात घ्या.

(अ) दादाभाई नौरोजी यांनी 1867-68 मध्ये भारताचे राष्ट्रीय उत्पन्न 340 कोटी आढळतो.

(ब) वाडिया व जोशी यांना 1913-14 साली भारताचे राष्ट्रीय उत्पन्न 1689 कोटी आढळले.

(क) राष्ट्रीय उत्पन्न समितीने राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याची निव्वळ उत्पादन पद्धत आणि निव्वळ उत्पन्न पद्धत सूचविली.

पर्यायी उत्तरे

(1) अ, ब, क बरोबर (2) अ आणि क बरोबर

(3) ब, क बरोबर (4) अ आणि ब बरोबर

Consider the following statements about India's attempt to measure national income.

(a) Dadabhai Naoroji found the national income of India to be 340 crore.

(b) Wadia and Joshi found national income to be 1689 crore in 1913-14.

(c) National income committee suggested the net production method and net income method to measure national income.

Answer options :

(1) a, b, c correct (2) a and c correct

(3) b, c correct (4) a and b correct

---

36. राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे,

(अ) एका आर्थिक वर्षात देशांतर्गत उत्पादित होणाऱ्या सर्व अंतिम वस्तू व सेवांचे मूल्य होय.

(ब) एका आर्थिक वर्षात देशांतर्गत कुटुंब संस्थानी, उद्योग संस्थानी व सरकारने केलेला खर्च आणि निव्वळ निर्यात मूल्य होय.

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त अ बरोबर (2) फक्त ब बरोबर

(3) अ व ब दोन्ही चूक (4) अ व ब दोन्ही बरोबर

National income means,

(a) The monetary value of all final goods and services produced within a nation in given financial year.

(b) It is the total of expenditure by households, firms and government and the value of net exports in the given financial year.

Answer option

(1) Only a correct (2) Only b correct

(3) a and b incorrect (4) a and b both correct

37. स्थूल देशांतर्गत उत्पादन भाजक कोणते?

(अ) GDP Deflator $= \frac{\text{Nominal GDP}}{\text{Real GDP}} \times 100$

(ब) GDP Deflator $= \frac{\text{Real GDP}}{\text{Nominal GDP}} \times 100$

(क) GDP Deflator $= \frac{\text{Nominal GVA}}{\text{Real GVA}} \times 100$

पर्यायी उत्तरे:

(1) अ व ब बरोबर
(2) अ, क बरोबर
(3) फक्त अ बरोबर
(4) फक्त ब बरोबर

GDP Deflator means

(a) GDP Deflator $= \frac{\text{Nominal GDP}}{\text{Real GDP}} \times 100$

(b) GDP Deflator $= \frac{\text{Real GDP}}{\text{Nominal GDP}} \times 100$

(c) GDP Deflator $= \frac{\text{Nominal GVA}}{\text{Real GVA}} \times 100$

Answer Options:

(1) a and b correct
(2) a and c correct
(3) Only a correct
(4) Only b correct

चाणक्य मंडल परिवार

38. (अ) GDP एखाद्या अर्थव्यवस्थेची एकूण अंतर्गत शक्ती दर्शविते.

(ब) GDP मुळे एखाद्या अर्थव्यवस्थेचे संख्यात्मक आकलन होते.

(क) GDP मुळे एखाद्या अर्थव्यवस्थेचे गुणात्मक आकलन होते.

योग्य विधाने निवडा.

पर्यायी उत्तरे :

(1) अ योग्य
(2) अ व क योग्य
(3) अ, ब, क योग्य
(4) अ व ब योग्य

(a) GDP represents the total internal power of an economy.

(b) GDP gives quantitative understanding of an economy.

(c) GDP gives qualitative understanding of an economy.

Identify correct statements.

(1) a only
(2) a and c only
(3) a, b, c only
(4) a and b only

---

39. क्रयशक्ती समानतेविषयी खालील विधाने विचारात घ्या.

(अ) क्रयशक्ती समानता हा विनिमय दराच्या शक्ती दर्शविण्याचा आर्थिक सिद्धांत आहे.

(ब) क्रयशक्ती समानता हा चलनाची खरेदीशक्ती दर्शविण्याचा आर्थिक सिद्धांत आहे.

(क) क्रयशक्ती समानतेची संकल्पना कार्ल गुस्ताव कॅसेल या स्विडिश शास्त्रज्ञाने सुचविली.

पर्यायी उत्तरे :

(1) अ, ब, क योग्य
(2) ब, क योग्य
(3) अ, ब योग्य
(4) अ, ब, क अयोग्य

Consider the following statements about purchasing power parity.

(a) Purchasing power parity is an economic theory of exchange rate power.

(b) Purchasing power parity is an economic theory of expressing purchasing power of currency.

(c) Karl Gustav cassel a swedish economist proposed the concept of purchasing power parity.

Answer options

(1) a, b, c correct
(2) b, c correct
(3) a, b correct
(4) a, b, c incorrect

चाणक्य मंडल परिवार

40. ढोबळ राष्ट्रीय आनंद निर्देशांकासंबधी खालील विधाने लक्षात घ्या.

(अ) GNH मोजण्यासाठी 7 आयाम, 33 निर्देशांक व 3 आधारस्तंभ आहेत.

(ब) राजे जिग्मे सिंगे वांगचुक यांनी 1972 मध्ये GNH ही संकल्पना सुचविली.

(क) चांगले शासन, शाश्वत, आर्थिक, सामाजिक विकास, सांस्कृतिक जपणूक आणि पर्यावरणीय जतन हे 4 आधारस्तंभ आहेत.

पर्यायी उत्तरे

(1) अ, ब, क योग्य (2) अ, ब योग्य

(3) ब, क योग्य (4) अ, क योग्य

Consider the following statements regarding Gross National happiness index.

(a) These are 7 dimensions, 33 indicator's and 3 pillars to measure GNH.

(b) GNH concept was proposed by King Jigme Singye Wangchuk in 1972.

(c) Good Governance, sustainable economic social development, cultural preservation and conservation of environment are four pillars of GNH.

Answer options

(1) a, b, c correct (2) a, b correct

(3) b, c correct (4) a, c correct

---

41. केंद्रीय सांख्यिकी कार्यालयाचे खालीलपैकी कोणते कार्य नाही?

(अ) सांख्यिकी संबंधीत क्रियांमध्ये समन्वय राखणे.

(ब) सांख्यिकी मानके तयार करणे व लागू करणे.

(क) राष्ट्रीय लेखे तयार करणे.

(ड) कृषी संबंधीत सातत्यपूर्ण आकडेवारी गोळा करणे.

(इ) ग्राहक किंमत निर्देशांक मोजणे.

(फ) आर्थिक व सामाजिक नियोजन व नियोजनातील धोरणे आखणे.

पर्यायी उत्तरे :

(1) ब, फ (2) ड, फ

(3) ब, इ (4) ड, इ

Which of the following is not the work of central statistical office?

(a) Co-ordination in statistical activities

(b) Formulation and application of statistical standards

(c) Preparation of national accounts

(d) Collecting consistent statistics regarding agriculture

(e) To measure consumer price index.

(f) Economic and social planning and strategic formulation of planning.

Answer options

(1) b, f (2) d, f

(3) b, e (4) d, e



चाणक्य मंडल परिवार

42. खालील विधाने लक्षात घ्या.

(अ) जानेवारी 2000 मध्ये सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली देशातील सांख्यिकी गणना प्रक्रियेचे पुर्नपरिक्षण करण्यासाठी आयोग स्थापन करण्यात आला.

(ब) या आयोगाच्या शिफारसीनुसार जुलै 2006 ला पहिल्या सांख्यिकी आयोगाची स्थापना करण्यात आली.

(क) राष्ट्रीय सांख्यिकी आयोगाचे पहिले अध्यक्ष सी. रंगराजन हे होते.

(ड) अर्थतज्ज्ञ किंवा गणिततज्ज्ञ हे या आयोगाचे अध्यक्ष असतात.

पर्यायी उत्तरे

(1) अ, ब योग्य (2) ब, क योग्य

(3) क, ड योग्य (4) अ, ड योग्य

Consider the following statements.

(a) In January 2000 a commission was set up under the Chairmanship of C. Rangarajan to review the statistical census process in the country.

(b) Based on the recommendation of this committee the first National Statistical Commission was formed in July 2006.

(c) First Chairperson of National Statistical Commission was C. Rangarajan.

(d) Chairperson of NSC should be economist or mathematician.

Answer options

(1) a, b correct (2) b, c correct

(3) a, d correct (4) a, d correct

---

43. भारतातील राष्ट्रीय उत्पन्न मापनातील समस्या खालीलपैकी कोणत्या?

(अ) वास्तविक माहितीतील त्रुटी (ब) संघटित क्षेत्राचे मोठे आकारमान

(क) वित्तीय निरक्षरता (ड) निर्देशांकातील अंतर्गत त्रुटी

पर्यायी उत्तरे

(1) अ, ब, क, ड (2) अ, ब, क

(3) ब, क (4) अ, क, ड

Which of the following are problems in national income measurement in India?

(a) Real information caveats (b) Large size of organized sector

(c) Financial literacy (d) internal errors in indexes

Answer options

(1) a, b, c, d (2) a, b, c

(3) b, c (4) a, c, d



चाणक्य मंडल परिवार

44. व्यापारचक्राचा योग्य क्रम लावा.

(1) तेजी - मंदी - घसरण - पुनरुत्थान
(2) मंदी - तेजी - घसरण - पुनरुत्थान
(3) तेजी - घसरण - मंदी - पुनरुत्थान
(4) घसरण - मंदी - तेजी - पुनरुत्थान

Correct sequence of business cycles is?

(1) Inflation - Depression - Recession - Revival
(2) Depression - Inflation - Recession - Revival
(3) Inflation - Recession - Depression - Revival
(4) Recession - Depression - Inflation - Revival

---

45. मंदीची लक्षणे व परिणाम याविषयी खालील विधाने लक्षात घ्या.

(अ) उत्पादन थांबते
(ब) चलनाचे मुल्य सुधारते
(क) व्याजदर शुन्याच्या खाली जातो
(ड) निर्यात वाढते, आयात घटते
(इ) तीव्र बेरोजगारी निर्माण होते

पर्यायी उत्तरे :

(1) अ, क, ड योग्य
(2) अ, ब, क, ड योग्य
(3) अ, क, इ योग्य
(4) अ, ब, क, इ योग्य

Consider the following statements about depression symptoms and effects

(a) Production stops
(b) The value of currency improves
(c) Interest rate goes below zero
(d) Export increases, import decreases
(e) Severe unemployment is experienced

Answer option

(1) a, c, d correct
(2) a, b, c, d correct
(3) a, c, e correct
(4) a, b, c, e correct

---

46. कोविड-19 महामारीनंतरच्या काळात भारतात खालीलपैकी कोणते पुनरुत्थान दिसून आले?

(1) U - shaped recovery
(2) V - shaped recovery
(3) √ Shaped recovery
(4) L - shaped recovery

After Covind-19 which type of recovery is addressed in India?

(1) U - shaped recovery
(2) V - shaped recovery
(3) √ Shaped recovery
(4) L - shaped recovery



चाणक्य मंडल परिवार

47. योग्य जोड्या ओळखा.

| NSSO चे विभाग | मुख्यालयाचे ठिकाण |
|---|---|
| (अ) सर्व्हे डिझाईन व रिसर्च | - कोलकत्ता |
| (ब) डाटा प्रोसेसिंग | - फरीदाबाद |
| (क) फिल्ड ऑपरेशन | - दिल्ली |
| (ड) समन्वय व प्रकाशन विभाग | - कलकत्ता |

पर्यायी उत्तरे

(1) अ व ब योग्य (2) ब व क योग्य

(3) अ व क योग्य (4) ब व ड योग्य

Identify the correct pairs.

| Department of NSSO | Headquarters |
|---|---|
| (a) Survey design and Research | - Kolkatta |
| (b) Data processing | - Faridabad |
| (c) Field operation | - Delhi |
| (d) Coordination and publication department | - Kolkatta |

Answer options

(1) a and b correct (2) b and c correct

(3) a and c correct (4) b and d correct

---

48. स्थूल राष्ट्रीय उत्पाद मोजताना खालीलपैकी कोणत्या घटकांचा समावेश केला जात नाही?

(1) बेकायदेशीर क्रिया

(2) पूर्णपणे आर्थिक व्यवहार

(3) वापरलेल्या वस्तू आणि विक्रीयोग्य नसलेल्या वस्तू व सेवांचे हस्तांतरण

(4) वरीलपैकी सर्व

Which of the following items are not included while measuring the Gross National Product?

(1) Illegal activities

(2) Purely financial transactions

(3) Transferring of used goods and non market goods and services.

(4) All of the above

चाणक्य मंडल परिवार

49. व्ययक्षम उत्पन्नाबद्दल खालीलपैकी कोणते विधान योग्य आहे?

(1) वैयक्तिक उत्पन्न आणि प्रत्यक्ष करातील फरकाला व्ययक्षम उत्पन्न म्हणतात.

(2) खासगी उत्पन्न आणि अप्रत्यक्ष करातील फरकाला व्ययक्षम उत्पन्न म्हणतात.

(3) वैयक्तिक उत्पन्न आणि अप्रत्यक्ष करातील फरकाला व्ययक्षम उत्पन्न म्हणतात.

(4) खासगी उत्पन्न आणि प्रत्यक्ष करातील फरकाला व्ययक्षम उत्पन्न म्हणतात.

Which of the following is true for Disposable income?

(1) Disposable income is the difference between personal income and direct taxes.

(2) Disposable income is the difference between private income and indirect taxes.

(3) Disposable income is the difference between personal income and indirect taxes.

(4) Disposable income is the difference between private income and direct taxes.

---

50. खालीलपैकी कोणते विधान बंदिस्त अर्थव्यवस्थेची व्याख्या देते?

(1) बंदिस्त अर्थव्यवस्था ही अर्थव्यवस्थेच्या अशा प्रकारे आहे ज्यात पैशाचा पुरवठा हा पूर्णपणे सरकारद्वारे नियंत्रित केला जातो.

(2) बंदिस्त अर्थव्यवस्था ही अर्थव्यवस्थेच्या अशा प्रकारे आहे ज्यात आयात निर्यात पूर्णपणे बंद असते.

(3) बंदिस्त अर्थव्यवस्था ही अर्थव्यवस्थेच्या अशा प्रकारे आहे ज्यात तुटीचा वित्तपुरवठा होतो.

(4) बंदिस्त अर्थव्यवस्था ही अर्थव्यवस्थेच्या अशा प्रकारे आहे ज्यात दुसऱ्या देशांना निर्यात केली जात नाही.

Which of the following defines a closed economy?

(1) A closed economy is a type of economy where the money supply is totally controlled by government.

(2) A closed economy is a type of economy where neither - exports nor imports takes place.

(3) A closed economy is a type of economy where deficit financing takes place.

(4) A closed economy is a type of economy where there are no exports to other countries.

चाणक्य मंडल परिवार